# श्री. वसंतदादा पाटील यांचे नेतृत्व

प्राचार्य डॉ. दिनकर पाटील
भोगावती महाविद्यालय,कुरुकली ता. करवीर जि. कोल्हापूर

प्रस्तावनाः—महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील आपल्या विविध भूमिकेमुळे महाराष्ट्रातील एक सुपरिचित व्यक्तिमत्व होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांच्या चळवळीतील लक्षणिय कार्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये वसंतदादांचा सक्रीय सहभाग होता. एक काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते, तालुका व जिल्हयाचे सेक्रेटरी, महाराष्ट्राचे सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष, पाटबंधारे मंत्री आणि महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री, अखिल भारतीय काँग्रेस आय चे सरचिटणीस आणि राज्यस्थानचे राज्यपाल होते. त्यांच्या या सर्व कामगीरीचा ठसा मराठी लोकांच्या मनावर उमटलेला आहे. या सर्वाबरोबर सहकार क्षेत्रातील वसंतदादांच्या योगदानामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर केवळ महाराष्ट्रातीला नव्हे तर भारतवर्षाला देखील एक नवीन ओळख झाली आहे. सहकार चळवळीतील त्यांची मुलभूत स्वरुपाची कामे महाराष्ट्राच्या प्रगतीमधील महत्वाचा घटक बनली आहेत.

श्री. वसंतदादा पाटील यांचे योगदान महाराष्ट्राच्या विकासातील आणि राजकारणातील सहभाग लक्षात घेता वसंतदादांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास महत्वाचा आहे. राजकारणामध्ये असूनदेखील वसंतदादांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रांकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. कारण सगळया क्षेत्रांचा विकास एकाचवेळेला होणे हे संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. याची त्यांना जाणीव होती. वसंतदादांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान हे त्यांच्या राजकीय योगदानाइतकेच महत्वाचे आहे.

श्री. वसंतदादांचे राजकीय नेतृत्व

1) स्वातंत्र्यपूर्व काळ – 1927 ते 1946
2) राजकीय कृती कार्यक्रम – 1946 ते 1951
3) आमदार विधानसभा म्हणून – 1952 ते 1971
4) पाटबंधारे मंत्री – 1972 ते 1975

पहिल्यांदा मुख्यमंत्री – 17 एप्रिल 1977 ते 7 मार्च 1978
दुस—यांदा मुख्यमंत्री – 7 मार्च 1978 ते 17 जुलै 1978
तिस—यांदा मुख्यमंत्री –2 फेब्रुवारी 1983 ते 9 मार्च 1985
चौथ्यांदा मुख्यमंत्री – 10 मार्च 1985 ते 2 जून 1985 (मुख्यमंत्री म्हणून 3 वर्षे 7 महिने 4 दिवस कालावधी मिळाला)

श्री. वसंतदादा पाटील हे दुस—यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि दि. 17 जुलै 1978 रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि दुस—याच दिवशी पुरोगामी लोकशाही दलाचे श्री. शरद पवार यांचे मंत्रिमंडळ जनता आणि मित्र पक्षांच्या मदतीने अधिकारावर आले. यानंतरचा कालखंड हा श्री. वसंतदादा पाटील यांच्या अस्तित्वाच्या कसोटीचा कालखंड होता असे मानावे लागेल आणि तो काळ म्हणजे 1978 ते 1983 हा होय. कारण केंद्रामध्ये जनता पक्षाचे सरकार होते व भारताच्या संसदेमध्ये काँग्रेस पक्षाचे नेते श्री. यशवंतराव चव्हाण होते.

दोन काँग्रेस गटाचे ऐक्य होण्याचे प्रयत्न होत असताना वाटाघाटी चालू असताना काँग्रेसमधील काही आमदारांनी जनता पक्षासारख्या विरोधी पक्षाबरोबर आघाडीचे मंत्रिमंडळ बनवावे हा विरोधाभास होता. ऐक्य व्हावे यासाठी वसंतराव नाईक व वसंतदादा पाटील यांनी पुढाकार घेऊन विशेष प्रयत्न केले होते व करीत होते. विधानसभा निवडणुकीपूर्वी जनता पक्ष हा काँग्रेसचा शत्रू आहे अशी काँग्रेसची भूमिका असताना जनता पक्षाच्या साहाय्याने काँग्रेस फुटीरांनी राज्य करणे लाजीरवाणे आहे व जनता पक्ष काँग्रेसला वाढविण्यासाठी आला आहे असे उद्‌गार श्री. वसंतदादा पाटील यांनी 16 ऑगस्ट 1978 रोजी सांगली शहर काँग्रेस कमिटीच्या बैठकीत बोलताना काढले होते. त्यानंतर मिरज तालुक्यातील संतोषवाडी येथे शेतकरी व काँग्रेस कार्यकर्ते यांच्या मेळाव्यापुढे बोलताना श्री. वसंतदादा पाटील यांनी आवाहन केली की—"यापुढे शेतक—याला संघटित होऊनच आपले प्रश्न सोडवावे लागतील. सध्याचे सरकार हे भांडवल धार्जिणे असल्याने शेतक—यांच्या हिताची त्यांना कदर नाही. त्यामुळे सरकारकडून आपले प्रश्न सोडवून घ्यावयाचे असतील तर आपणास त्यासाठी लढाच द्यावा लागेल व त्याची सुरवात गाव पातळीपासून करावी लागेल. आजपर्यंत कार्यकर्त्यांना मंत्र्यांच्या स्वागताला सिध्द व्हावे लागत असे पण आता आपले प्रश्न सोडविण्यासाठी मंत्र्यापुढे मोर्चा काढावा लागणार आहे. तशी तयारी आतापासून प्रत्येकाने केली पाहिजे. संघटित झाले पाहिजे मागण्यासाठी आग्रह धरला पाहिजे. एकसारखा आग्रह धरला की, आपल्या मागण्या सरकारला मान्य कराव्या लागतील".

अखिल भारतीय काँग्रेसचे एकमुखी नेतृत्व श्रीमती. इंदिरा गांधी यांना पाहिजे होते. ते मान्य होत नव्हते म्हणून ऐक्य होत नव्हते. यशवंतराव चव्हाण वगैरे नेत्यांचा इंदिरा गांधीच्या धोरणाला विरोध होता.

कारण त्या धोरणाचे स्वरुप एकाधिकारशाहीचे वाटत होते. त्यातूनच गैरसमज वाढत गेले व एकमेकांच्या धोरणांचा पाठपुरावा करत असताना महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा यांच्यामध्ये आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या. जुने वाद उकरुन निघू लागले. नेतेच उघडपणे अपशब्द वापरू लागल्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांची कुचंबना होऊ लागली. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांना या दोन नेत्यांच्यामध्ये कटुता निर्माण झाल्यामुळे दुःख होत होते.

नोव्हेंबर 1978 मध्ये सांगली सहकारी साखर कारखान्याची निवडणूक झाली, विरोध झाला. या निवडणूकीत वसंतदादांच्या कर्तृत्वाचा व जनसेवेचा विजय झाला.

मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यानंतर वसंतदादांनी सामाजिक, राजकीय व सहकारी क्षेत्रात ज्या संस्था उभारल्या त्यांचे संगोपन केले. त्या संस्थांमध्ये मिळालेल्या मानाच्या स्थानास धक्का देण्याचा प्रयत्न मत्सराने व संधिसाधुपणाने त्रस्त झालेल्या सहकारी म्हणविणा–या मित्रांनी केला होता व त्या सामाजिक अग्निपरिक्षेत त्यांचे निःस्वार्थी कार्य तावून सुलाखून निघत होते. वसंतदादांच्या विरोधकांचा प्रत्येक आघाडीवर पराभव होत होता.

नोव्हेंबर 1979 रोजी सांगलीच्या नगरपरीषदेच्या स्टेडीयमवर मेळावा भरला होता. त्यावेळी वसंतदादा म्हणाले होते की, "एकूण देशाचे राजकारण पाहीले म्हणजे मनात चीड येते. मनाला खिन्नता वाटते. पण जेव्हा मी येथे येतो, तेव्हा मनाला हुरूप येतो. लोक ज्या भावनेने पाहतात, भेटतात त्यावेळी वाटते की, कसलीही संकटे येवोत लोकांच्या भल्यासाठी राबण्यासाठी काम करीत राहीले पाहीजे. आपल्या प्रेमाचा हा संदेश आहे. आपण रोज वर्तमानपत्रे पाहतो. आमच्या काँग्रेस पार्टीने चुका केल्याचे प्रायश्चीत्त आम्हाला मिळाले. जेव्हा लोक आपल्याला नाकारतात तेव्हा आग्रहपूर्वक सत्तेवर बसण्याची गरज नसते काँग्रेस पक्षाची परिस्थिती बिघडली म्हणून ती सावरण्यासाठी आपण काय केले म्हणून ते म्हणाले–माझा व यशवंतरावांचा संबंध म्हणजे भावाभावंडांच नातं असे मी मानत आलो. आपण पायाचे दगड. त्या शिखराचा भाग उंच दिसावा या भावनेने वागलो. मला जर यशवंतराव म्हणाले असते की, दादा मेहेरबानी करून तुम्ही मुख्यमंत्री होऊ नका, तुला बालिदानास तयार झाले पाहीजे, तर मी तयार झालो असतो, तुमचा निर्णय मानला असता. आणि सार्वजनिक कामात वेळ घालविला असता, पण त्यांनी मला फसवलं. आपण यापुढे त्यांना अधिक नावे ठेवण्याचे काम करणार नाही त्यांच्याबद्दल आपुलकी असुन सुध्दा त्यांनी चुकीचा मार्ग पत्करला, तो मला पसंत नाही. ती परिस्थिती सांगणं आमचं काम आहे.

सांगली जिल्हा परिषदेमध्ये वसंतदादांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला गेला. वसंतदादा पाटील हे सर्वसामान्यांचे लोकनेते असल्यामुळे महाराष्ट्राच्या घराघरात वसंतदादा कामाच्या रूपाने पोहोचलेले होते. जिल्हा परिषदा व नगरपालिका ही विकासाची केंद्र समजून या ठिकाणी स्थिर सत्ता आवश्यक असते. स्थिरता राखण्यासाठी स्थानिक पातळीवर काँग्रेसने इतर पक्षांचीही युती करण्यास हरकत नाही असे वसंतदादांनी निवडणूक प्रचाराच्या संदर्भात मत मांडले होते.

सप्टेंबर 1979 मध्ये वसंतदादा पाटील शंकरराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, नरेंद्र तिडके, स.का. पाटील, के.के.शहा वगैरेंनी इंदिरा काँग्रेसमध्ये जाहीरपणे प्रवेश केला. नोव्हेंबर 1979 ला लोकसभा निवडणूका जाहीर झाल्या. इंदिरा काँग्रेसमध्ये महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षातील नेते सामील झाले होते. ठिकठिकाणी समारंभपूर्वक कार्यकर्ते इंदिरा काँग्रेसमध्ये येत होते. अशा स्थितीत वसंतदादा पाटील यांना इंदिरा काँग्रेसने सांगली लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली.

डिसेंबर 1979 च्या लोकसभा निवडणुकीत सांगली जिल्हयातून वसंतदादा पाटील 1 लाख 60 हजारांच्या विक्रमी मताने लोकसभेवर निवडून आले. महाराष्ट्रात बहुसंख्येने इंदिरा काँग्रेसला यश मिळाले तसेच भारतातील इतर राज्यातही मिळाले आणि इंदिरा काँग्रसेच्या नवनिर्वाचित खासदारांनी श्रीमती इंदिरा यांनाच आपला नेता म्हणून निवडले. आखिल भारतीय नेतृत्व पुन्हा श्रीमती इंदिरा गांधीना जनतेने दिले होते. जनता पक्षाचा पराभव करून श्रीमती इंदिरा गांधीनी काँग्रेस पक्षास पुन्हा प्रतिष्ठेचे स्थान मिळवून दिले त्यामुळेच पुन्हा त्या भारताच्या पंतप्रधान झाल्या.

श्री. वसंतदादांच्या लोकसभेतील संसदीय कार्याची सुरूवात 1980 सालाच्या सुरवातीला झाली. महाराष्ट्रातील पुलोद मंत्रिमंडळाबद्दलचा असंतोष वाढत होता. राजकीय विरोधात तोंड देण्यास अधिक वेळ जात असल्यामुळे जनतेच्या अडचणींकडे लक्ष देण्यास मंत्र्यांना फुरसत नव्हती. सिमेंट व डिझेल अशा अत्यावश्यक वस्तुंचा अपूरेपणा पर्यायाने ग्रामीण भागात विकासाला खीळ बसण्याची परिस्थिती झाली होती. म्हणून श्री. वसंतदादांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील खासदारांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधानांच्या शिफारसीवरून राष्ट्रपतींनी महाराष्ट्राची विधानसभा 17 फेब्रुवारी 1980 रोजी बरखास्त केली. पुढे मे 1980 मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका झाल्या. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा म्हणून श्रीमती प्रेमलाताई आनंदराव चव्हाण या होत्या.

इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्रातील तिकीटवाटप कोणत्याही तत्वावर झालेले नसून त्यामध्ये गटबाजी झाली आहे व त्याबद्दल वसंतदादा नाराज होते. महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्ते इंदिरा काँग्रेसमध्ये आणण्यास, दोन्ही काँग्रेसचे ऐक्य घडवून आणण्यास त्यांनतर 1980 च्या लोकसभा निवडणूकीत इंदिरा काँग्रेसला भरघोस यश मिळविण्यास श्री. वसंतदादा पाटील यांनी अपार कष्ट घेतले होते. खासदार श्री.

वसंतदादा पाटील यांची अखिल भारतीय काँग्रेस (आय) पक्षाचे सरचिटणीस म्हणून ऑगस्ट 1980 मध्ये नेमणूक करण्यात आली. वसंतदादांच्याकडे देशातील उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश व काश्मिर या राज्यांतील इंदिरा काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक कार्याची जबाबदारी सोपविली होती.

खासदार वसंतदादांनी त्या तीन राज्यातील पक्षीय समस्या सोडविण्यासाठी आपल्या वैशिष्टयपूर्ण शैलीने त्या राज्यातील कार्यकर्त्यांशी जिव्हाळयाचे संबंध निर्माण केले होते. थोडया अवधीत हिंदी भाषा आत्मसात केली होता. महाराष्ट्राचे दादा उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, काश्मिरमध्ये गरजू देशबांधबांचे दादाजी बनले होते. थोडयाच दिवसात खासदार वसंतदादा पाटील यांची सरचिटणीस म्हणून लोकप्रियता उत्तर भारतातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पटू लागली होती. सर्वांना मदत करणारे दादाजी सर्वांच्या आदराचे स्थान होऊन राहिले होते.

ऑगस्ट 1980 मध्ये आखिल भारतीय काँग्रेस आय कमिटीचे सरचिटणीस म्हणून नेमणूक झाल्यानंतर थोडयाच दिवसात दिल्लीमध्ये किसान मेळावा भरविण्याचे ठरले. मेळाव्याची संपूर्ण जबाबदारी घेतल्यानंतर दिल्लीमध्ये फेब्रुवारीमध्ये होणारा आखिल भारतीय किसान मेळावा फेब्रुवारीमध्ये होणारा आखिल भारतीय किसान मेळावा हे खास वसंतदादांच्या कार्यकुशलतेस आव्हान होते. कारण सर्व भारतातून लाखोंच्या संख्येने शेतकरी या मेळाव्यास उपस्थित राहणार होते. त्या सर्वांची व्यवस्था करणे खूपच अवघड होते. खासदार वसंतदादा व त्यांचे सहकारी कार्यकर्ते यांनी आहोरात्र कष्ट घेऊन किसान मेळाव्याची तयारी केली. नियोजीत किसान मेळावा बोटक्लब मैदानावर भरणार होता. देशातील विविध भागांतून येणा—या शेतक—याची व्यवस्था दिल्लीतील मोकळया मैदानावर तूं ठोकून केली होती. तसेच ज्या त्या भागातील काँग्रेस खासदारांच्या निवासात काही कार्यकर्ते थांबणार होते. संपर्क दिल्ली भारतातील विविध पोषाखातील शेतक—यांचे व कष्टक—यांचे उपस्थितीमुळे गजबजून गेली होती. 16 फेब्रुवारी 1981 रोजी दुपारी दीड वाजता काँग्रेस आय किसान मेळावा दिल्लीच्या ऐतिहासिक बोटक्लब मैदानावर लाखो शेतक—यांच्या उपस्थितीत भरला होता.

खासदार वसंतदादा यांनी सरचिटणीस म्हणून पार पाडलेले महत्वाचे कार्य म्हणजे हा किसान मेळावा होय. या मेळाव्यामुळे खास वसंतदादांच्या संघटना कौशल्याचा, व्यवस्थापन कौशल्याचा व संघटनात्मक नेतृत्वाचा काँग्रेस आय श्रेष्ठींना व कार्यकर्त्यांना या किसान मेळाव्यामुळे अनुभव आला. एप्रिल 1981 मध्ये यशवंतराव चव्हाण यांचे काँग्रेस आयमध्ये स्वगृही आगमन झाले. त्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याची चर्चा व वाटाघाटी सुरू झाल्या. खाव. वसंतदादा पाटील यांच्या नावाचाही चर्चा झाली. तेव्हा वसंतदादांनी मुख्यमंत्री पदासाठी इच्छुक नसल्याचे जाहिर करून टाकले होते. त्यामुळे काँग्रेस आय पक्षश्रेष्ठींनी बॅ. बाबासाहेब भोसले यांची मुख्यमंत्रीपदासाठी निवड केली व ते महाराष्ट्राचे मुखमंत्री झाले.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या पदाधिका—यांची निवड, मुंबईतील गिरणी कामगारांचा संप आणि इतर अनेक समस्यामुळे भोसले सरकार अडचणीत आले होते.महाराष्ट्रातील कामगारांच्या शिष्टमंडळाने मुंबईतील गिरणी कामगारांचा संप मिटवण्याचे प्रयत्न वसंतदादांनी करावेत व मिल मजदूर संघाचे नेतृत्व स्विकारावे अशी सूचना पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे दिल्लीत जाऊन केली होती. त्यास खास. वसंतदादांनी मान्यताही दिली होती.

सांगली जिल्हयाचीच नव्हे तर महाराष्ट्राच्या व पर्यायाने भारताच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्वाची ऐतिहासिक घटना 24 मे 1982 रोजी कृष्णाकाठच्या अंकलखोप या गावी घडली. त्यामुळे जनतेच्या मनातील कोंडमारा संपला होता. श्री. धुळाप्पाण्णा नवले व श्री. बाजीराव पाटील यांनी पुढाकार घेऊन हे दोन नेते चार वर्षानंतर एकत्र आणले होते. यशवंतराव चव्हाण व वसंतदादा पाटील यांचे वैर संपले होते. महाराष्ट्रातील मराठी माणसांना वैभवाचे दिवस येण्याची वेळ आली होती. या कार्यक्रमाकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले होते. दिल्लीपर्यंत या कार्यक्रमाचे खूप वाटले होते. मराठयांचे एकत्रीकरण झाले मतभेद संपले होते. दोघांच्या भांडणामुळे महाराष्ट्राचे नुकसान झाले होते.

संदर्भग्रंथः—

1) महाराष्ट्राचा महापुरुष वसंतदादा पाटील
श्री. भालचंद्र विष्णू धर्माधिकारी, 1986, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा.
2) राजयोग — वसंतदादांचे आत्मचरित्र
निवेदक—श्री. वसंतदादा पाटील शब्दांकन— प्रा. मोहन पाटील 1 मार्च 1990 अक्षर प्रकाशन, सांगली.
3) वसंतगौरव — 13 नोव्हेंबर 1986
संपादन— डॉ. सरोजिनी बाबर, प्रकाशन —प्रा. रामकृष्ण मोरे, पुणे.
4) वसंतदादा पाटील व्यक्ती आणि कार्य
डि. जी. पाटील माणिक मोती प्रकाशन, कोल्हापूर 3 मे 1984.